CMYK

बीड । शनिवार

२६.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : २६

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com


# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# व्हिसा रद्द ! 'पाकिस्तान्यांना शोधून-शोधून माघारी पाठवा', अमित शाहांचे सर्व मुख्यमंत्र्यांना निर्देश



**नवी दिल्ली**

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने मोठा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानशी संबंधित सर्व व्हिसा रद्द करण्यात आलेले आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली... अधिकाऱ्यांसोबतच्या बैठकीनंतर गृहमंत्र्यांनी हा निर्णय घेतला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकार ॲक्शन मोडवर आहे. भारताने मोठं पाऊल उचलत भारत-पाकिस्तान या दोन देशांमधला सिंधू करार स्थगित केला आहे. भारताने पाकिस्तानला औपचारिक पत्र पाठवत सिंधू पाणी करार स्थगित केल्याची माहिती दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या सुरक्षा समितीच्या बैठकीमध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आलेले आहेत. भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत देश सोडावा लागणार आहे. जे लोक भारतातून जाणार नाहीत, त्यांना पकडून पाकिस्तानात पाठवलं जाणार आहे. स्थानिक पोलिसांना तशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. बुधवारच्या बैठकीमध्ये सिंधू करार स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. भारत- पाकिस्तानमध्ये १९६० मध्ये सिंधू जत करार लागू झाला. सिंधू नदीला पाकिस्तानची लाईफलाईन म्हटलं जातं. साधारण २१ कोटींपेक्षा जास्त लोक सिंधू आणि तिच्या चार उपनद्यांवर अवलंबून आहेत.

**● भारत सरकारचे पाच मोठे निर्णय**

१. सिंधू जल संधि (१९६०) तात्काळ स्थगित – पाकिस्तानने सीमापार दहशतवादास अखंडनीयपणे पाठिंबा थांबविल्याशिवाय करार पुन्हा प्रभावी करण्यात येणार नाही.
२. अटारी-वाघा एकत्रित तपासणी चौकी बंद – पाकिस्तानमध्ये वैध व्हिसावर गेलेले प्रवासी १ मेपूर्वीच या मार्गे परतू शकतील.
३. सार्क व्हिसा सवलत योजना रद्द पाकिस्तानी नागरिकांना या योजनेअंतर्गत भारतात येण्यास मनाई. याअंतर्गत पूर्वी दिलेले सर्व व्हिसा रद्द समजले जातील. सध्या अशा व्हिसावर भारतात असलेल्यांना ४८ तासांत देश सोडावा लागेल.
४. सैन्य सल्लागार अवांछित (परसोना नोन ग्रेटा) व्यक्ती जाहीर – नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायोगातील लष्कर, नौदल व वायूदल सल्लागारांना एक आठवड्यात भारत सोडण्याचे आदेश; इस्लामाबादातील भारतीय सल्लागारांना देखील परत बोलावले जाईल. सहाय्यक कर्मचाऱ्यांनाही दोन्ही उच्चायोगांतून परत घेतले जाईल.
५. उच्चायोगातील कर्मचारीसंख्या कपात सद्य ५५ वरून ३० पर्यंत मर्यादित १ मेपासून अंमलात येईल.

## बीडचे पोलिस निरीक्षक सुनिल नागरगोजे बडतर्फ

**बीड । प्रतिनिधी**

येथील पोलीस नियंत्रण कक्षात नियुक्तीस असलेल्या पोलीस निरीक्षक सुनिल नागरगोजे यास पोलीस महासंचालकांनी बडतर्फ केले आहे. तत्कालीन पोलीस अधिक्षकांना केलेली शिवीगाळ, बीड येथे कार्यालयीन कर्मचाऱ्यास दिलेली धमकी आणि सतत गैरहजर राहणे हे प्रकार नागरगोजेंना भोवल्याचे सुत्रांनी सांगितले. शिवीगाळ केली होती. त्याचबरोबर बीड येथे नियुक्तीस असतांना एका कार्यालयीन कर्मचाऱ्यास धमकी दिली होती. नागरगोजे नेहमी गैरहजर (सिक रजेवर) रहायचे. वर्ष वर्ष ते कर्तव्यावर येत नव्हते, त्यामुळे त्याच्या बीड जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेले आणि सध्या नियंत्रण कक्षात नियुक्तीस असलेले पोलीस निरीक्षक सुनिल नागरगोजे हे परभणी येथे नेमणूकीस असतांना त्यांनी बीडच्या तत्कालीन पोलीस अधिक्षकांना अहवाल तत्कालीन पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांनी वरिष्ठांना पाठवला होता. या प्रकरणात काही सुनावण्या देखील झाल्या. शेवटी पोलीस महासंचालक कार्यालयाने या सर्व प्रकरणाची दखल घेत नागरगोजे यांच्यावर बडतर्फची कारवाई केली.

## वारकरी बनून आले अन् महिला भाविकांच्या दागिन्यांवर डल्ला मारला; अठरा जणांच्या टोळीला पोलिसांनी पकडले

**वाळकी । प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील अकोळनेर येथे संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या सदेह वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त आयोजित गाथा पारायण आणि अखंड हरीनाम सप्ताहात वारकरी बनून आलेल्या जालना जिल्ह्यातील महिला व पुरुषांच्या टोळीने महिला भाविकांच्या दागिन्यांवर डल्ला मारला. वेळीच ही बाब लक्षात



आल्यावर तेथील नागरिकांनी चोरट्यांच्या अठराजणांच्या टोळीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

अकोळनेर येथील संत तुकाराम गाथा पारायणाची काल (दि. २३) सांगता झाली. त्यामुळे भाविकांच्या गर्दीचा उच्चांक झाला. दुपारी १२ वाजता सांगता झाल्यानंतर दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली. या गर्दीत अनेक महिलांच्या गळ्यांतील सोन्याच्या दागिन्यांच्या चोऱ्या होऊ लागल्या. काही वेळात चोऱ्यांच्या या घटना निदर्शनास आल्या. त्यामुळे स्वयंसेवक सतर्क झाले. त्यांनी चोरट्यांची शोध मोहीम सुरू केली. काही वेळातच तीन ते चार महिला आणि काही पुरुषांना पकडण्यात आले. बंदोबस्तावरील पोलिसांना माहिती मिळताच नगर तालुका पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते

▶▶ उर्वरित पान २ वर

## झेंडा लावण्याचा कारणावरून आष्टीतील खडकत मध्ये पोलिसासमोरच तुफान राडा

**● दोन गट आमने सामने भिडले, एकमेकांची डोके फोडली**



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीच्या घटना वाढताना दिसत आहेत. काही महिन्यापूर्वीच महाराष्ट्राला हादरवणारं संतोष देशमुख हत्याकांड घडलं. यानंतर गुन्हेगारीच्या विविध घटना समोर आल्या. त्यामुळे महाराष्ट्रात बीडची ओळख गुन्हेगारी जिल्हा म्हणून बनताना दिसत आहे.

आष्टी तालुक्यातील खडकत येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती २० एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात परंतु खडकत येथील एका चौकामध्ये निळा झेंडा लावल्याने काही लोकांनी त्यावर आक्षेप घेत विरोध केला, पोलिसांना व तहसीलदार याना या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी जाऊन दोन्ही झेंडे सन्मानपूर्वक काढण्यात परंतु अचानक झेंडा काढण्याच्या कारणावरून दोन गटात तुफान राडा झाल्याची घटना समोर आली आहे. बीडच्या आष्टी तालुक्यातील खडकत येथे दोन गट आपसात भिडले आहेत. जवळपास २५०-३०० तरुणांनी रस्त्यावर उतरून एकमेकांच्या दिशेनं दगडफेक केली आहे. यावेळी काहींनी हातात लाकडी

▶▶ उर्वरित पान २ वर

## पुन्हा मोठं संकट, उरले फक्त काही तास; २३ राज्यांसाठी धोक्याची घंटा, महाराष्ट्रालाही हाय अलर्ट

**मुंबई । प्रतिनिधी**

देशात पुन्हा एकदा वातावरणात मोठा बदल झाला आहे. एकीकडे देशातील अनेक भागांना उष्णतेच्या लाटेचा तडाखा बसत आहे, तर दुसरीकडे २३ राज्यांना अतिवृष्टी आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर



आणि पश्चिम भारतामध्ये जोरदार

▶▶ उर्वरित पान २ वर

## भारताच्या कारवाईने पाक सैन्य घाबरले; लष्करप्रमुखाचे कुटुंब खाजगी विमानाने देश सोडून पळाले



**वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर देशभरातून तीव्र संताप व्यक्त होतोय. शिवाय, केंद्र सरकारनेही या घटनेस जबाबदार असलेल्या पाकिस्तानविरोधात विविध कारवाया सुरू केल्या आहेत. या सर्व कारवायांमुळे पाकिस्तानी सैन्यात प्रचंड घबराट पसरली आहे. यामुळेच पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी आपल्या कुटुंबाला खासगी विमानाने परदेशात पाठवले आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या ४८ तासांच्या आत भारताने युद्धनौका आयएनएस सूरतवरुन क्षेपणास्त्र चाचणी केली. यामुळे अरबी समुद्रात पाकिस्तानी नेव्हीला कडक संदेश मिळाला. याशिवाय, केंद्राने हवाई दल आणि सैन्याला तयार कुठल्याही परिस्थितीसाठी तयार राहण्याचे आदेश दिले आहेत. यामुळेच पाकिस्तानी सैन्यात प्रचंड अस्वस्थता पसरली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पाकिस्तानी लष्करप्रमुखांसह पाकिस्तानच्या अनेक लष्करी अधिकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबियांना खाजगी विमानाने ब्रिटन आणि न्यू जर्सीला पाठवले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देश दहशतवादाचे आश्रयस्थान असलेल्या पाकिस्तानवर कठोर कारवाईची मागणी करत आहे. भारतातील सर्व राजकीय पक्षही या मुद्द्यावर केंद्र सरकारसोबत आहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर

## घरात अठराविश्व दारिद्र्य, क्लासला पैसे नव्हते, तरीही...

# बीडच्या अक्षय मुंडेंने युपीएससी परीक्षा क्रॅक कशी केली? म्हणाला..

**बीड । प्रतिनिधी**

आई इंदुबाई मुंडे यांनी शेतात राबत कष्ट करत माझ्या शिक्षणाकडं लक्ष दिलं. आई आजही शेतात काम करते. स्वतः निरक्षर असली तरी तिने मला घडवलं आहे. माझ्या यशामागे तिचा मोलाचा वाटा आहे. मी परिक्षेत यशस्वी झालो आणि आईचा चेहरा आनंदाने फुलला, हेच माझं खरं यश आहे, अशी प्रतिक्रिया केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) परीक्षेत यश मिळवलेल्या पांगरी (गोपीनाथ गड) येथील डॉ. अक्षय संभाजीराव मुंडे यांनी एबीपी माझाशी बोलताना दिली आहे. अक्षय यांच्या यशात त्यांच्या



आईसोबतच बहिणीचा, अक्षता हिचाही मोठा वाटा आहे, असे ते अभिमानाने सांगतात.

बीड येथील पांगरी (गोपीनाथ गड) परिसरीतील रहिवासी असलेल्या अक्षयचे शिक्षण स्थानिक संत भगवान बाबा विद्यालयात इयत्ता पहिली ते दहावी झाले. पुढे अकरावी-बारावी परळी येथील न्यू हायस्कूल ज्युनिअर कॉलेजमध्ये, तर बीडीएसचे शिक्षण लातूरमधील एमआयटी कॉलेजमध्ये घेतले. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी त्याने पुण्यात काही काळ क्लास लावले आणि नंतर थेट नवी दिल्ली गाठून तयारी सुरू ठेवली. अखेर अथक

▶▶ उर्वरित पान २ वर

## 23 वर्षीय विवाहित महिलेची आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

चऱ्हाटा फाटा परिसरात राहणाऱ्या एका २३ वर्षीय विवाहित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना (दि. २५) रोजी सकाळी घडली. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. घटनेची माहिती ग्रामीण पोलिसांना मिळाल्यानंतर घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. सविस्तर माहिती अशी कि, वैष्णवी किशोर बहिर (वय २३) रा. शिरापूर ह. मु. चहाटा फाटा या महिलेने आज सकाळी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती ग्रामीण पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. या महिलेच्या पश्चात एक मुलगी, एक मुलगा, पती असा परिवार आहे. महिलेच्या आत्महत्येचे कारण स्पष्ट होऊ शकले नाही. या प्रकरणाचा अधिक तपास बीड ग्रामीण पोलिस करीत आहेत.




CMYK



# ... तेव्हा पोलिसांनी तक्रारही घेतली नाही, मेंढपाळाचा तोच आता IPS बनला

आयुष्यात अनकेदा काही प्रसंग चित्रपटासारखे घडत असतात, तर काहीवेळा जे प्रसंग माणसाच्या आयुष्यात घडतात तेच चित्रपटात ७० मिमिच्या पडद्यावर झळकतात. काही दिवसांपूर्वी १२ th फ ेल हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. विक्रांत मेस्सीने या सिनेमात आयपीएस अधिकारी मनोजकुमार शर्मा यांची भूमिका साकारली होती. हा चित्रपट तुफान गाजला. तर, १९९९ मध्ये आमीर खानचा सरफरोश सिनेमा प्रदर्शित झाला होता, त्यानेही प्रेक्षकांची वाहवा मिळवली. याच सरफरोश सिनेमातील आमीर खान एका प्रसंगाप्रमाणेच कोल्हापूरच्या युपीएससी क्रॅक केलेल्या बिरदेव डोणेची कथा आहे. ज्या बिरदेव ढोणेची पोलिसांनी साधी तक्रारही घेतली नाही, तो बिरदेव डोणे आज आयपीएस अधिकारी बनलाय.

सरफरोश सिनेमात आमीर खान एका मध्यम वर्गीय कुटुंबातील व्यक्ती असून त्याच्या वडील व भावाला काही गुंडांकडून मारहाण झालेली असते. आपल्यावरील या अन्यायाची तक्रार देण्यासाठी आमीर खान पोलीस स्टेशनला जातो, पण पोलिस त्याला कसलीही दाद देत नाहीत. व्यवस्थेबदलचा हा संताप त्याच्या मनाला चटका देतो आणि पुढे आमीर खान आयपीएस अधिकारी बनतो, एसीपी राठोड बनून तो कित्येक पोलिसांचा साहेब बनतो. कोल्हापूर जिल्ह्याच्या कागल तालुक्यातील बिरदेण ढोणेच्या यशातही अशाच कित्येक संघर्षमय गोष्टींचा साठा आहे. युपीएससी परीक्षेतून आज आयपीएस झाल्यानंतर त्याने आयुष्याचा खडतर प्रवास सांगितला, त्यातील एक घटना ही आमीर खानच्या सरफरोश सिनेमातील दृश्याप्रमाणेच म्हणता येईल. ज्या पोलिसांनी बिरदेवची तक्रार घेतली नाही, तो बिरदेव आता आयपीएस अधिकारी बनला आहे.

फोन चोरीला गेला, पोलिसांना भावच नाही दिला

युपीएससीची मुलाखत दिल्यानंतर



ज्ञानप्रबोधिनी येथील अभ्यास केंद्रावरुन जात असताना रात्री ११ वाजता राधिका भेळ येथून माझा फोन चोरीला गेला. माझा फोन चोरीला गेला ही गोष्ट मी अद्यापही घरी सांगितली नाही. घरी सांगितलंय की माझा फोन बंद पडलाय. पण खरं तर माझा फोन चोरीला गेलाय. त्यामुळे, आजही माझ्या बीडच्या मित्राचा फोन मी वापरत आहे, असे बिरदेवने सांगितले. तसेच, फोन चोरीला गेल्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो, तेव्हा त्यांनी आम्हाला भावच नाही दिला, माझी तक्रारही घेतली नाही, असे बिरदेवने एका मुलाखतीत बोलताना सांगितले.


निकाल लागला तेव्हाही तो मेंढ्याच चरत होता

कोल्हापुरातल्या एका मेंढपाळाच्या मुलाने युपीएससी क्रॅक करुन लाखो गरिब, वंचित आणि सर्वसामान्य कुटुंबातील तरुणांपुढे आदर्श निर्माण केलाय. गावखेड्यातील विद्यार्थ्यांच्या आशेचा किरण तो बनलाय. बिरदेव सिद्धापा ढोणे असं त्याचं नाव असून यूपीएससी परीक्षेत त्याने देशात ५५१ वा क्रमांक मिळवला. विशेष म्हणजे निकाल लागल्यानंतर तो बेळगावमधील अथणीमध्ये मेंढ्या घेऊन गेला होता. वाड्या-वस्त्यावर, माळरानावर जाऊन शिकलेला बिरदेव आता देशसेवत आपलं योगदान देणार आहे. त्याच्या या निवडीनंतर सर्वच स्तरातून त्याचा सत्कार, सन्मान केला जात आहे. एखाद्या चित्रपटाला शोभेल अशीच संघर्षगाथा बिरदेवची आहे.

# उन्हाळ्यात घामाच्या त्रासाने हैराण आहात? 'फ्रेश' राहण्यासाठी या सोप्या टिप्स फॉलो करा!

एप्रिल-मे महिन्यांत उन्हाची तीव्रता वाढत असताना, घाम येणं ही एक सामान्य आणि नैसर्गिक प्रक्रिया असली तरी, काही वेळा हे त्रासदायक देखील ठरू शकतं. शरीराचे तापमान संतुलित ठेवण्यासाठी घाम येतो, परंतु सतत घाम येणं, कपड्यांचा ओलसरपणा आणि त्यातून होणारी दुर्गंधी यामुळे अनेक वेळा सार्वजनिक ठिकाणी लाजीरवाणी स्थिती निर्माण होते. विशेषतः काम ाच्या ठिकाणी, शाळेत किंवा गर्दीत सतत ओले कपडे आणि घामाचा वास हा आत्मविश्वास कमी करू शकतो. याशिवाय, घामाच्या सतत संपर्कामुळे त्वचेवर बॅक्टेरिया वाढण्याची शक्यता असते आणि त्यामुळे बऱ्याचदा स्किन इन्फेक्शन, खरूज, पुरळ आणि खाज यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे उन्हाळ्यात आरोग्याची काळजी घेणं अत्यंत आवश्यक आहे.

१. योग्य कपड्यांची निवड करा- उन्हाळ्यात कपड्यांची निवड तुमचं आरोग्य ठरवू शकते. कापूस, तागा



किंवा रॅमी यासारख्या नैसर्गिक फॅब्रिकचे कपडे वापरल्यास घाम त्वरीत शोषला जातो आणि शरीर थंड राहते. याशिवाय, सैलसर आणि हलक्या रंगाचे कपडे उन्हाच्या तीव्रतेपासून बचाव करतात. घट्ट कपड्यांमुळे त्वचेला हवा मिळत नाही आणि दुर्गंधी व खाज यांसारख्या समस्या निर्माण होतात.

२. आहारात थंड पदार्थांचा समावेश करा- उन्हाळ्यात मसालेदार, तेलकट आणि कॅफिनयुक्त पदार्थ टाळावेत. हे अन्न शरीराचे तापमान वाढवतं आणि घाम जास्त प्रमाणात येतो. त्याऐवजी नारळ पाणी, ताक, दही, काकडी, कलिंगड आणि लिंबूपाणी यांचा आहारात समावेश केल्यास शरीराला नैसर्गिक थंडावा मिळतो आणि घाम येणं नियंत्रणात राहतं.

३. बायोफीडबॅक थेरपीचा विचार करा- अती घाम येणं ही 'हायपरहायड्रोसिस' नावाची वैद्यकीय स्थिती असू शकते. अशावेळी बायोफीडबॅक थेरपी उपयुक्त ठरते. या थेरपीद्वारे शरीरातील घामाच्या प्रमाणावर लक्ष ठेवून, तुमचं मन आणि शरीर तणावमुक्त करायला मदत मिळते.

४. थंड पाण्याचा वापर करा- दिवसभरात शक्य तितक्या वेळा थंड पाण्याने चेहरा, हात-पाय स्वच्छ धुणं आवश्यक आहे. याशिवाय, अंडरआर्म्स, मान किंवा पाठीवर बर्फाचा थंड कपडा ठेवून शरीराचं तापमान कमी करता येतं.

# फ्रिज भिंतीपासून किती अंतरावर असावा? अन्यथा वीज बिल येईल भमसाठ

आजच्या काळात घरात सर्वात महत्त्वाची असणारी उपकरणे म्हणजे फ्रिज, टीव्ही, ओव्हन ज्याच्या त्याच्या गरजेनुसार लागणाऱ्या इलेक्ट्रॉनिक वस्तू. त्यांची जशी आपल्याला गरज असते तशीच त्यांची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे असते. तर ते नक्कीच चांगलीच सर्वीस देतात. आणि बराच काळ टिकतात. त्यातील एक महत्त्वाचं उपकरण म्हणजे फ्रिज जो कि जवळपास प्रत्येक घरात असतोच असतो. भाज्या ठेवण्यापासून ते थंडगार पाणी पिण्यापर्यंत सगळ्यासाठीच उपयुक्त फ्रिज हा लागतोच. फ्रिज भिंतीपासून अंतरावर असणे का गरजेच? फ्रिज साफ ठेवणे जेवढे गरजेचं असतं सोबतच अजून एक गोष्ट माहित असणंही तेवढंच महत्त्वाचं असतं. ती एक गोष्ट म्हणजे फ्रिज आणि भिंतीमध्ये अंतर असणे. फ्रिज आणि भिंतीमध्ये एक अंतर ठेवणे गरजेचं असतं. पण ते किती असावं? आणि त्याचे फायदे काय ते जाणून घेऊयात. फ्रिज भिंतीला चिटकून ठेवला तर काय होतं? फ्रिज भिंतीला चिटकून ठेवणे योग्य नसून त्यात काही अंतर सोडणे आवश्यक असते कारण त्या अंतरामुळे रेफ्रिजरेटर स्वतःला थंड करणे शक्य होते. रेफ्रिजरेटरला आतील भाग थंड ठेवण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. या प्रक्रियेदरम्यान मागील ग्रिलमधून उष्णता सोडली जाते. या कारणास्तव, तुमचा रेफ्रिजरेटर थेट भिंतीला चिकटून न ठेवणं खूप महत्वाचं आहे. तसेच भिंतीला चिटकून ठेवला तर फ्रिज लवकर गरम होतो. त्याची काम करण्याची क्षम ताही मंदावते तसेच थंड होण्यासाठी तो जास्त वेळ घेतो ज्यामुळे वीज बिल वाढतं. त्यामुळे रेफ्रिजरेटर मागील भिंतींपासून आणि, वरच्या कॅबिनेटपासून १ इंच अंतरावर आणि दोन्ही बाजूंनी किमान १/४ इंच अंतरावर असावा. महत्वाचं म्हणजे तुमचा रेफ्रिजरेटर भिंतीपासून दूर ठेवण्याव्यतिरिक्त, तो थेट हीटर किंवा इतर उष्णता स्त्रोताजवळ न ठेवणे देखील महत्वाचे आहे. अशा पद्धतीने काळजी घेतली तर फ्रिज हा नक्कीच अजून जास्त काळ टिकेल.आणि तुम्ही जास्त काळ या उपक्रमाचा उपयोग करून घेऊ शकाल.

पान १/४ वरून पुढे...

## वारकरी बनून...

फौजफाट्यासह तेथे दाखल झाले. नागरिकांनी पकडलेल्या महिला व पुरुषांकडे कसून तपासणी केल्यावर काही महिलांकडे चोरलेले दागिने सापडले. तसेच त्यांच्या इतर साथीदारांचाही शोध घेण्यात आला. या चोरट्यांच्या टोळीत एकूण अठरा जणांचा समावेश असल्याचे समोर आले. या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

चोरट्यांच्या टोळीमध्ये चिरंजीव रमेश शिंदे (वय १८), प्रभाकर गंगाधर पवार (वय २६), आण्णा शिवाजी शिंदे (वय २८), गयाबाई शंकर शिंदे (वय ५६), अंजली मंगेश शिंदे (वय ३५), शांताबाई सुनील जाधव (वय ६२), लक्ष्मी माधव पवार (वय ३२), रोहिणी किसन पवार (वय २५), प्रियांका अमोल शिंदे (वय ३०), गयाबाई राजेश पवार (वय ५५), अनिता अर्जुन शिंदे (वय ३२), शीला शंकर गायकवाड (वय ४५), सुनीता अनिल शिंदे (वय ४२), सरिता विलास शिंदे (वय ५२), हिराबाई रमेश शिंदे (वय ३०), रुपाली प्रभाकर पवार (वय २५), सपना कृष्णा शिंदे (वय २८), संगीता अण्णा शिंदे (वय २५, सर्व रा. गोंदी, ता. अंबड, जि. जालना) यांचा समावेश आहे. याबाबत कांचन सुधीर जाधव (वय २३, रा. अकोळनेर, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून या चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दागिने चोरीला गेल्याबाबत चार महिलांनी पोलिसांना जबाब दिले असून, त्यातील तीन महिलांचे १ लाख ३५ हजारांचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले आहेत.

## झेंडा लावण्याचा....

दांडे आणि इतर शस्त्र घेऊन दहशत माजवण्याचा देखील प्रयत्न केला. या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ समोर आला असून सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या तुफान दगडफेकीत काहीजण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी आष्टीच्या खडकत गावातील एका चौकात झेंडा लावण्यावरून वाद झाला होता. हा वाद झाल्यानंतर गुरुवारी दुपारी घटनास्थळी पोलीस दाखल झाले. पोलिसांनी संबंधित झेंडा चौकातून काढून टाकला. यावेळी दोन गटात तणाव निर्माण होऊन त्यांनी एकमेकांवर दगडफेक केली. गुरुवारी झालेल्या वादाचे पडसाद आज शुक्रवारी देखील बघायला मिळाले. दोन्ही बाजुने झालेल्या दगडफेकीमुळे गावात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. या दगडफेकीमध्ये महिलांनाही मार लागला असून, दलित वस्तीवर गावातल्या व इतरच्या आसपासच्या गावातील लोकांनी दगडफेक करत महिला सह मुलांना देखील मारहाण केल्याची माहिती मिळत आहे. सध्या परिस्थिती तणावपूर्ण आहे. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी खडकत येथे जाऊन समाज बांधवांना शांत राहण्याचे आवाहन करत,जे विद्यार्थी युवक या दगडफेकीत किंवा भांडणांमध्ये सामील नव्हते तरी त्यांना पोलीस ताब्यात घेतल्याचा आरोप केला आहे.

पान १/४ वरून पुढे...

## पुन्हा मोठं...

पावसाचा इशारा देण्यात आला आहे. वेस्टर्न डिस्टबन्समुळे जम्मू-कश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांमध्ये २५ आणि २६ एप्रिल रोजी वादळी वाऱ्यासह अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बांग्लादेश आणि आसामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे, त्यामुळे पूर्व भारतात वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह अतिमुसळधार पाऊस पडू शकतो असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मिझोरम, नागालँड, या राज्यांमध्ये पुढील सात दिवस जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच या राज्यांमध्ये वादळं देखील होणार असून, या काळात ताशी ६० ते ७० किमी प्रति तास वेगानं वारे वाहण्याची शक्यता आहे, या पार्श्वभूमीवर आयएमडीकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.दक्षिण भारताना देखील पाऊस झोडपून काढणार आहे. दक्षिण भारतामध्ये तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आध्र प्रदेश आणि पाँडेचेरी या राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दुसरीकडे बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये देखील जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, सिक्कममध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्रात मात्र उष्णतेचा तडाखा बसणार आहे, आणखी काही दिवस महाराष्ट्रात उष्णतेची लाट पाहायला मिळणार आहे. राज्यात ब्रम्हपुरीमध्ये सर्वाधिक ४५.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याला हाय अलर्ट देण्यात आला आहे.

## भारताच्या कारवाईने...

पाकिस्तानविरुद्ध कारवाई करत केंद्र सरकारने शेजारील देशासोबतचा सिंधू पाणी करार स्थगित केला. याशिवाय, अटारी-वाघा सीमेवरुन होणारी वाहतूक थांबवण्यात आली आहे. तसेच, पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले असून, त्यांना ४८ तासांच्या आत देश सोडण्यास सांगण्यात आले आहे.

## घरात अठराविश्व...

परिश्रमाच्या जोरावर त्यांनी UPSC परीक्षेत देशभरातून ६९९ वा क्रमांक मिळवत यश संपादन केलं. अक्षय मुंडे यांनी सहाव्या प्रयत्नात ही यश मिळवले आहे.अक्षय यांच्या यशात त्यांच्या आईसोबतच बहिणीचा, अक्षता हिचाही मोठा वाटा आहे, असे ते अभिमानाने सांगतात. त्यांच्या या यशामुळे पांगरी गावासह परळी तालुक्यातील अनेक ठिकाणी उत्साहाचे वातावरण असून, मित्रपरिवार आणि गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. नुकताच केंद्रीय लोकसेवा आयोगाचा परीक्षेचा निकाल जाहीर झाला यामध्ये परळी तालुक्यातील पांगरीचा अक्षय मुंडे यांनी ६९९

पान १/४ वरून पुढे...

रॅंक मिळवला. त्याचे मूळ गाव असलेल्या पांगरीत भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी त्याच्यावर जेसीबीतून फुलांची उधळण देखील करण्यात आली. आधी अक्षयच्या आईने औक्षण केले. त्यानंतर अक्षय मुंडे यांनी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या समाधीचे दर्शन देखील घेतले.

घरात हलाकीची परिस्थिती असताना कोचिंगसाठी पैसे नव्हते म्हणून स्वतःच अभ्यास करावा लागला. यामुळे मला यासाठी सहा वर्ष लागले.आईची मेहनत होती आणि बहिणीचा आशीर्वाद होता, कोणीही सोबत नसलं तरी शेवटी देव आहे असं स्वतःला सांगत होतो. प्रयत्न करत राहा यश मिळेल. बारावीपर्यंत शिक्षण परळी तालुक्यात झालं. त्यानंतर बीडीएस केलं. आईने व्याजाने पैसे घेऊन मला शिकवलं. माझ्या नावावर कर्ज देखील आहे. पुण्यामध्ये कोचिंगसाठी ऍडमिशन घेतले होते. मात्र पैसे नसल्यामुळे त्यांनी मला तिथे येऊ दिलं नाही. कुणाला बघून यूपीएससी करू नका. जोपर्यंत मनापासून येत नाही. प्रोसेस समजून घ्या. हे समजून घेतल्यास तुम्हाला कोचिंगची देखील गरज नाही, खचून जाऊ नका. नेहमी पॉझिटिव्ह रहा. तुकाराम मुंढे, किरण कुमार गित्ते, हे माझ्यासाठी इन्स्पिरेशन होते. माझ्या यशाचे श्रेय मी आई-बहीण आणि स्वामी सम र्थांना देतो असेही अक्षय मुंडे म्हणाले आहेत.

## अधिकाऱ्यांचा सत्कार...

झाल्यानंतर मित्रमंडळी आणि जनतेला आवाहन केले की, त्यांनी सत्कारासाठी बुके आणू नये. बुक आणावे. ही बाब अधिकाऱ्यांनी लक्षात घेतली पाहिजे. आपल्या सत्कारासाठी कोण आले, त्यांचे धंदे काय आणि त्याच बरोबर त्यांनी आजपर्यंत काही गैरव्यवहार केलेला आहे का ? याची चाचपणी संबंधित अधिकाऱ्याने नंतर केली पाहिजे. त्या गैर कारभारावर आळा घातला पाहिजे. मात्र असे होत नाही.

बीड जिल्ह्यातील प्रशासन जनतेसाठीचे राहिलेले नाही, हे अनेक वेळा दिसून येते. पुढारी आणि अधिकारी यांचे संगणमत झाल्याने अनेक मोठमोठे घोटाळे बीड जिल्ह्यात झालेले आहेत. आमच्यामुळे अनेक घोटाळ्यात कारवाई झाली. अनेक घोटाळे आम्ही हाणून पाडले. नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या संदर्भातली माहिती घेतली पाहिजे.

आमच्या बोलण्याचा अनेकांना राग येईल. मात्र आम्ही सार्वजनिक रित्या सर्वांना बोलत नाहीत. तर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अनेक लोकांनी सत्काराच्या माध्यमातून अनेकांना फसवल्याचे स्पष्ट झालेले आहे. त्याम ुळे अशा गुन्हेगारांना अधिकाऱ्यांनी रोखले पाहिजे. म्हणून आम्ही या विषयावर बोलत आहोत. यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा की, अधिकारी सामान्य माणूस म्हणजेच साधारण कपडे घालून आलेला म ाणूस सत्कारासाठी आल्यानंतर उठत नाहीत. पांढरे शुभ्र कपडे असलेल्या माणसांसाठी ते उठून सत्कारासाठी सज्ज होतात. हा देखील सामान्य जनतेच्या मनावर आघात करणारा एक प्रश्न आहे. त्यामुळे सामान्य जनतेने देखील सत्काराला जाण्याची आवश्यकता नाही.

पान १/४ वरून पुढे...

वास्तविक पाहता सेवा नियमाप्रमाणे काम करत असताना पन्नास रुपयांच्या वरील कोणतीही वस्तू भेट घेत असताना ती शासनाला कळवणे गरजेचे आहे. या वस्तूंमध्ये सत्काराचे साहित्य वगळून, असे लिहिलेले नाही. आम्ही अनेक अधिकारी सत्कार स्वीकारत नाहीत, हे पाहिलेले आहे. त्यामुळे दोनशे, पाचशे आणि हजार रुपयांचा बुके तुम्ही कसा स्वीकारता ? हा देखील प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे जनतेला आम चे आवाहन आहे की, अधिकाऱ्यांचा सत्कार करू नका. प्रायोगिक पातळीवर बदलून जाणारा अधिकारी नवीन अधिकाऱ्याचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करत असतो. तोच सत्कार जिल्हा वासियांतर्फे झाल्याचे समजले जावे. अधिकाऱ्यांनी देखील आपल्या सत्कारावर बंधन आणावे, असेही ड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

## परळीमध्ये 'युवा...

महेश बँक परळीचे चेअरमन श्री. ओमप्रकाशजी सारडा, परळी तालुका माहेश्वरी सभा सहसचिव श्री. शिवजी भंडारी, बीड जिल्हा महिला मंडळाच्या उपाध्यक्षा श्रीमती सुजाताजी मुंदडा, डॉ. सुनीता झंवर, डॉ. अनीता तोतला, डॉ. स्मिता तापडिया, चेंबर ऑफ कॉमर्सचे श्री. संदीप लाहोटी, शिक्षण महर्षी पूजाजी सारडा, समाजसेविका श्रीमती वंदना दरक, अरुणा सारडा, सोनल जाजू, सुनंदा भंसाली आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महेश भगवानाच्या पूजनाने करण्यात आली. या प्रसंगी पेलगाम येथे झालेल्या हल्लयात शहीद झालेल्या भारतीय जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमात श्री. नितेशजी लोहिया, श्री. ओमप्रकाशजी सारडा आणि डॉ. सुनीता झंवर यांनी मार्गदर्शन करत उपस्थित युवती आणि त्यांच्या पालकांना गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची माहिती दिली आणि लसीकरणाचे महत्त्व समजावून सांगितले. या रोगावर योग्य वयात लस घेणे किती गरजेचे आहे, हे अतिशय सोप्या भाषेत समजावण्यात आले. कार्यक्रमात वैद्यनाथ बँकेचे नवनियुक्त मॅनेजर श्री. श्यामजी तोषनिवाल यांचा सन्मान करण्यात आला.

लसीकरणासाठी स्वतंत्र तीन कक्षांची व्यवस्था करण्यात आली होती आणि त्यांचे उद्घाटन करून लसीकरणास सुरुवात झाली. लस घेतलेल्या प्रत्येक युवतीला युवा माहेश्वरी परळी शाखेतर्फे एक रोप भेट देण्यात आले, जे आरोग्य आणि निसर्ग यांचे प्रतीक म्हणून ओळखले गेले. शिबिराचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी कोषाध्यक्ष श्री. संकेतजी मंत्री यांनी उपस्थितांचे आभार मानले.

युवा माहेश्वरी परळी शाखेचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्ते या संपूर्ण उपक्रमात सक्रिय सहभागी झाले. समाजाच्या आरोग्यासाठी व कल्याणासाठी राबवण्यात आलेला हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला आहे. युवा माहेश्वरी - समाजासाठी, समाजासोबत या ब्रीदवाक्यानुसार केलेली ही सेवा समाजात एक सकारात्मक आदर्श निर्माण करणारी आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## महत्वाचे

## रखरखत्या उन्हाळ्यात अंबाजोगाई परिसरातील नागरिकांना बसणार उकाड्याचा तडाखा!

### शनिवारी भरदुपारी विद्युत पुरवठा बंद राहणार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

एप्रिल महिन्याच्या कडाक्याच्या उन्हात अंबाजोगाई व परिसरातील नागरिकांना येत्या शनिवारी (दि.२६) वीज बंदीचा सामना करावा लागणार आहे. महावितरण अंबाजोगाई उपविभागाकडून दिलेल्या माहितीनुसार, ३३ के.व्ही. अंबाजोगाई उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरच्या प्लिंथच्या देखभाल दुरुस्तीच्या कामामुळे सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत वीजपुरवठा पूर्णपणे खंडित राहणार आहे. या देखभाल कामामुळे अंबाजोगाई व लोखंडी उपकेंद्राशी संलग्न तब्बल १३ फिडर्सवरील वीजपुरवठा बंद राहणार आहे. यामध्ये अंबाजोगाईतील छत्रपती शिवाजी महाराज चौक, योगेश्वरी, मोरेवाडी, हॉस्पिटल तसेच लोखंडी AG आणि वाघाळा फिडर्सचा समावेश आहे. त्याचप्रमाणे लोखंडी उपकेंद्रातील सोमनाथ बोरगाव, डिघोळ अंबा, चतुरवाडी, एम. बी. ॲग्रो, लोखंडी सावरगाव गावठाण व ऋ फिडर यांचा देखील वीजपुरवठा खंडित राहील. या वेळेत परिसरातील हजारो घरांमधील पंखे, कुलर, एसी, फ्रीज ठप्प होण्याची शक्यता असून, आधीच वाढलेल्या तापमानामुळे हैराण झालेल्या नागरिकांचे हाल अधिकच वाढणार आहेत. वीज नसल्याने दवाखाने, व्यवसाय, कार्यालये व घरगुती कामांवरही मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. महावितरणने नागरिकांना या काळात सहकार्य करण्याचे आवाहन केले असले, तरी काम उन्हाळ्याच्या तीव्रतेच्या काळात घेण्यात आल्याने लोकांमध्ये नाराजीचे सूर उमटू लागले आहेत.

## मुंबईच्या वेव्हज परिषदेत नवकल्पना सोबत तंत्रज्ञानाचा महासागर

**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या वतीने जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्राकरिता 'वेव्हज् २०२५ परिषद' मुंबईतील बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होत आहे. या परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवत आहेत. दि. १ ते ४ मे २०२५ या कालावधीत होत असलेल्या या परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. मुंबईत होणाऱ्या या परिषदेस विविध देशांचे मंत्री, धोरणकर्ते, उद्योगपती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. वेव्हज् परिषदेत जगभरातून १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून भारतातील क्रिएटिव्ह इकॉनॉमीला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे. भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन उद्योग वेगाने वाढत असून रोजगारनिर्मितीसाठी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर ओटीटी, निमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज परिषदेचे आयोजन होत असून या परिषदेत चर्चासत्रे, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक आणि विविध कार्यक्रम होणार आहे. या परिषदेच्या पहिल्या दिवशी 'भारत व महाराष्ट्र पॅव्हिलियन' आणि वेव्हज प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून काही महत्त्वपूर्ण घोषणा व सामंजस्य करार (MOU) करण्यात येणार आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा आ.विजयसिंह पंडित

## ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून किंवा सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी ३० एप्रिल पर्यंत करून घ्यावी

**गेवराई । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सद्या सर्व्हे सुरु असून गेवराई विधानसभा मतदार संघातील नागरिकांनी सद्या सुरू असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केले आहे.

प्रसिद्धी पत्रकात पुढे ते म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी गेवराई विधानसभा मतदारसंघात सद्या सर्व्हे सुरु आहेत. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून



आपली नोंदणी करू शकता. एक ते दहा निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत आपली नोंदणी करावी. नोंदणी करण्यासाठी ३० एप्रिल ही शेवटची तारीख असून त्या अगोदर गेवराई विधानसभा मतदार संघातील नागरिकांनी आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

### • अशी करावी नोंदणी

**सेल्फ सर्व्हे करण्यासाठी रुरी श्रिी २०२४ हे शासनाचे अधिकृत ॲप प्ले स्टोअर्सवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टोल करावे. नंतर रवहरी ऋलशीव ॲप देखील इंस्टॉल करून घ्यावे. त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून ॲपवर विचारलेली माहिती भरून शेवटी आपल्या कच्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा. आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.**

# पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बीड तालुका कॉंग्रेस पक्षाकडून तीव्र निषेध

## मानवतेला काळीमा फासणारी घटना : गणेश बजगुडे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बीड तालुका कॉंग्रेस व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत हा हल्ला अतिशय भ्याड व मानवतेला काळीमा फासणारा असुन हल्लेखोरांवर तत्काळ कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसचे नेते व शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले



आहे. काश्मीर येथील पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २७ निरपराध भारतीय पर्यटकांवर गोळ्या झाडून हत्या केली. ही घटना अतिशय निंदनीय व मानवतेला काळीमा फासणारी असुन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, गृहमंत्री अमित शहा यांनी यावर कठोरात कठोर भुमिका घेवुन ठोस उपाय योजना करायला हव्यात. जातीय धार्मिक तेढ निर्माण करून भ्याड हल्ले करणाऱ्यांवर सरकारने कारवाई तर करावीच परंतु देशाच्या सुरक्षिततेसाठी उपाय योजना देखील करायला हव्यात. या दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या सर्व भारतीयांना बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ परमेश्वर देवो असेही गणेश बजगुडे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## प्रियंका इंगळेला रोटरीचा चंपावती रत्न पुरस्कार

**बीड । प्रतिनिधी**

विश्वविजेत्या खो -खो संघाची कर्णधार बीडची कन्या कु.प्रियंका हनुमंत इंगळे हीला रोटरी क्लब ऑफ बीडचा चंपावती रत्न पुरस्कार जाहीर झाला होता. याचा वितरण सोहळा दि.२६ रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजीत करण्यात आला आहे. रोटरीचे प्रांतपाल रो.डॉ.सुरेश साबु, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रिडाधिकारी अरविंद विद्यागर यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आमदार सुनील धांडे यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. बीडची कन्या कु.प्रियंका हनुमंत इंगळे हीने बीडचे नाव देशभरात उंचावेल अशी कामगिरी केली. तिच्या नेतृत्वाखालील खो - खो संघाने विश्वविजेता बनण्याची कामगिरी केली. याबद्दल रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने तिचा चंपावती रत्न पुरस्कार २०२५ देवून गौरव केला जाणार आहे. दि.२६ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता कल्याण पिंगळे (दाजी) पब्लिक स्कुलच्या सभागृहात हा कार्यक्रम होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार सुनील धांडे हे राहणार आहेत. तर रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३२ चे प्रांतपाल रो.डॉ.सुरेश साबु, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# जालना जिल्ह्यात २६ ते २७ सप्टेंबर रोजी यलो अलर्ट जारी

### ▸ नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**



प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दि. २६ ते २७ एप्रिल २०२५ रोजी यलो अलर्ट जारी केला असुन या कालावधीमध्ये तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह पावसाची व ताशी ३० ते ४० कि.मी. प्रति तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधीत यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी, खबरदारीची उपाययोजना म्हणून खालीलप्रमाणे काळजी घ्यावी.

हे करावे :- विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळया जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा.आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका.आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा.पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

हे करु नका :-आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली आंघोळ करु नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाईन यांना स्पर्श करु नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका.धातूंच्या उंच मनो-याजवळ उभे राहू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण) गणेश महाडिक यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांनो फार्मर आयडी बनवला नसेल तर लगेच बनवून घ्या ! कृषी योजनांच्या लाभासाठी फार्मर आयडी अनिवार्य

**बुलढाणा । प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाच्या कृषी योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने पोहोचविण्यासाठी शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी १५ एप्रिलपासून अनिवार्य करण्यात आले आहे. जिल्ह्यात ५ लक्ष ७२ हजार १२८ खातेदार असून त्यापैकी ३ लक्ष ५० हजार ३०७ शेतकऱ्यांनी (६१.२३ टक्के) नोंदणी केली आहेत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडी बनवून घेतले नाही त्यांनी आपल्या जवळच्या सीएससी केंद्रावर नोंदणी करुन शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी बनवून कृषी योजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.



जिल्ह्यात एकूण खातेदारांपैकी ४ लक्ष ३४ हजार ४६८ प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतील लाभार्थी आहेत. त्यापैकी २ लक्ष ७३ हजार २३४ खातेदारांनी शेतकरी ओळखपत्र क्रमांक काढले असून त्याची टक्केवारी ६२.८९ इतकी आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी जसे कि, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, नमो शेतकरी सन्मान योजना, प्रधानमंत्री पिक विमा योजना, नानाजी देशमुख कृषि संजीवनी, महाडीबीटी, मदत व पुनर्वसन विभागामार्फत नैसर्गिक आपत्ती करिता देण्यात येणारी मदत याकरिता दि. १५ एप्रिल, २०२५ च्या शासन निर्णयानुसार अनिवार्य करण्यात आले आहे. अद्याप जिल्ह्यात २ लक्ष २१ हजार ८२१ शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र क्रमांक बनवून घेतलेले नाहीत. असे शेतकरी शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यांनी आपल्या ग्राम महसूल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व कृषि सहाय्यक यांना संपर्क साधून जवळच्या सीएससी केंद्रावर नोंदणी करून शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी बनवून कृषी व ईतर संलग्न विभागामार्फत योजनांचा लाभ घ्यावा. याबाबत शेतकऱ्यांना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या तहसील किंवा तालुका कृषि अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा. आपल्या नजीकचे सी.एस.सी.केंद्र शोधण्यासाठी शेतकऱ्यांनी र्हीींिं://श्रेलरीी. लीललश्रींव.ळप लिंकचा वापर करावा.

जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना विविध शासकिय योजनांचा लाभ व शासकीय मदत घेण्यासाठी शासन निर्णयानुसार शेतकरी ओळखपत्र क्रमांक अनिवार्य करण्यात आला असून ज्या शेतकऱ्यांनी अद्याप शेतकरी ओळखपत्र क्रमांक काढला नसेल त्यांनी आजच नजीकच्या सी.एस. सी केंद्रावर जावून आपले नावाची नोंदणी करून शेतकरी ओळखपत्र काढून घ्यावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

# IPS अधिकारी होताच बिरदेवची वाढली 'पावर'

## बेळगाव पोलिस अधीक्षकांनी थेट पालावर धाडलं अभिनंदनासाठी भेटीचं निमंत्रण

**मुरगूडे । प्रतिनिधी**

कागल तालुक्यातील यमगे येथील बिरदेव सिद्धाप्पा डोणे हा युवक मोठ्या जिद्दीने आयपीएस झाला. या परीक्षेचा निकाल जाहीर झाला, त्यावेळी बिरदेव हा बेळगाव जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील एका खेडेगावातील माळरानावर मेंढरे चारत होता.

दुर्दैवाने निकालादिवशीच बिरदेवचा फोन चोरीला गेला होता. पण, आई-वडील आणि भावाला त्याने फोन हरवला, असे न सांगता फोन बंद झाल्याचे सांगितले. आमीर खानसारखाच मेंढपाळाचा बिरदेव बनला खझड अधिकारी, 'सरफरोश' चित्रपटाशी काय कनेक्शन ?

त्यानंतर बिरदेव फोन चोरीला गेल्याची फिर्याद जवळच्या पोलिस ठाण्यात देण्यासाठी गेला. पण, तेथील पोलिसांनी त्याला दाद दिली नाही. दरम्यान, काही वेळातच परीक्षेचा निकाल लागला. यामध्ये बिरदेव ५५१ रैंकने उत्तीर्ण झाला. त्याची आयपीएस म्हणून निवड झाली. गुरुवारी (ता. २३) एका न्यूज चॅनेलला मुलाखत देताना त्याने पोलिस ठाण्यातील हा किस्सा बोलता बोलता सांगून टाकला होता.

त्याचवेळी त्याने लोक आपल्यापर्यंत येतात, त्यावेळी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे, हे आपले कर्तव्य



असल्याचेही बोलून दाखवले होते. बघता बघता ही मुलाखत सर्वत्र व्हायरल झाली आणि याची दखल थेट बेळगावच्या पोलिस अधीक्षकांनी घेतली. आज बेळगावचे पोलिस अधीक्षक डॉ. भीमाशंकर गुळेद यांनी बिरदेवला तो थांबलेल्या पालावर अभिनंदनासाठी भेटीचे निमंत्रण पाठवले. पोलिस अधीक्षक दालनात डॉ. गुळेद यांनी बिरदेवचा सत्कार केला. दरम्यान, बिरदेवचे अभिनंदन करण्यासाठी दिवसभर रीघ लागली होती. पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी मुंबईतून व्हिडीओ कॉलद्वारे अभिनंदन करून बिरदेवता शुभेच्छा दिल्या.


## जाहीर प्रगटन

**मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ६७८ / २०२५**

अर्जदार :- १. शमशाद बेगम शेख अहेमद, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. गोरेवस्ती, बालेपीर, बीड, ता. जि. बीड, २. शेख अबुबकेर सिद्दीकी शेख अहेमद, वय २७ वर्षे, धंदा व्यापार, रा. वरीलप्रमाणे, ३. शेख सादेक शेख अहेमद, वय २३ वर्षे, धंदा व्यापार, रा. वरीलप्रमाणे, ४. शेख उस्मान गणी शेख अहेमद, वय २० वर्षे, धंदा व्यापार, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द

निरंक

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे शेख अहेमद फयाज हे / या दि. १७/०३/२०२५ रोजी गोरेवस्ती, बालेपीर, बीड, ता. जि. बीड येथे मयत असुन अर्जदार के ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार के २ से ४ हे मयताचे मुले आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- २५/०४/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीख:- २०/०६/२०२५.
**(मार्फत विधिज्ञ: पी.आर. अंडील)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**
**शिक्का**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. के सी बागल मॅडम, ८ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ५९५ / २०२५**

**कचरूबाई वाघमारे व ईतर - वि . - निरंक**

ज्याअर्थी मयत नामे तुकाराम पि. आश्रुबा वाघमारे रा. शिवणी ता.जि.बीड हे दि. ०५.०१.२००५ रोजी मौजे शिवणी ता. जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार- १) कचरूबाई तुकाराम वाघमारे रा. शिवणी ता.जि.बीड ह.मु. साळींबा ता. वडवणी जि.बीड २) दिनकर तुकाराम वाघमारे रा. सदर

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे **तुकाराम पि. आश्रुबा वाघमारे** रा. शिवणी ता. जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज २५/०४/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : ०८/०५/२०२५
**(मार्फत- ॲड. वाय. आर. शेळके बीड)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**
**शिक्का**

दैनिक मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com
शनिवार, दि.२६ एप्रील २०२५ पान ४

## बीड बसस्थानकावर अश्लील वर्तन करणारा न्यायालयीन शिपाई तडकाफडकी निलंबित

**बीड । प्रतिनिधी**

बीड न्यायालयातील शिपाई शंकर अंबादास किरवले याने दि. २१ एप्रिल २०२५ रोजी बीड येथील बसस्थानकात महिलांकडे पाहून अश्लिल कृत्य केल्याबाबतचे वृत्त विविध वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित झाले होते. शंकर अंबादास किरवले, शिपाई यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन शिवाजी नगर बीड येथे गु.र.न २३२/२०२५ कलम ७९,७५ (१) (४) भा.न्या संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर गुन्हयातील प्रथम खबरी अहवाल व इतर कागदपत्रे जिल्हा न्यायालयास प्राप्त झाली असून शंकर अंबादास किरवले याचे कृत्य हे अशोभनिय असल्यामुळे शंकर अंबादास किरवले, शिपाई याला तात्काळ निलंबित करण्यात आले असून त्याच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.

# तीन वर्षे उलटले, अतिक्रमण काढायला गेवराई नगरपरिषदेला वेळ मिळेना

**अद्याप कोणतीही कारवाई नाही, स्थानिक व्यापाऱ्यांचा असा आरोप ; रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची व्यापाऱ्यांची मागणी**

**● अतिक्रमणाच्या कारवायात थंडावल्या**

**गेवराई । प्रतिनिधी**

शहरात सर्वत्र अतिक्रमण होत आहे. तसेच, अनधिकृत बांधकामे सर्रासपणे सुरू आहेत. त्यामुळे शहर बकाल होत असून, अतिक्रमणामुळे वाहतूक रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. निर्लज्ज कृत्याचा अद्याप कोणताही निष्कर्ष निघालेला नाही, कारण आजपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, ज्यामुळे स्थानिक रहिवासी संतप्त झाले आहेत. स्थानिक प्रशासकीय अधिकारी या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश कनिष्ठ अधिकाऱ्यांना देण्याचा जुना खेळ खेळत आहेत. या अतिक्रमणावर आठवड्यापासून धडक कारवाई करण्याची ग्वाही मुख्याधिकारी महोदयांनी दिली मात्र, वीस दिवस उलटूनही अद्याप ठोस कारवाई सुरू न झाल्याने राजकीय दबावाला बळी पडल्याची चर्चा वर्तुळात रंगली आहे. गेवराई नगरपालिकेच्या वतीने गेल्या अनेक दिवसापासून धडक कारवाई मोहीम जवळजवळ ठप्पच झाली आहे. त्यांच्या काळात झालेल्या कारवाईच्या ठिकाणी पुन्हा पत्राशेड, टपर्या व इमारती निर्माण झाल्या आहेत. नगरपरिषदेच्या काळात क्रमांक १५ ते २५ च्या दक्षिणेकडील जुन्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्या संदर्भात तत्कालीन मुख्याधिकारी विशाल भोसले साहेब यांनी गेल्या अनेक वेळेस व्यापाऱ्यांना तोंडी शब्द दिला होता की मी एक ते दीड महिन्यामध्ये अतिक्रमण काढून तुम्हाला रस्ता मोकळा करून देतो परंतु त्यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे अतिक्रमण हटवण्याची कारवाई बदली झाल्यामुळे केली नाही तरी आपल्या कार्यालयाने त्यातल्याही प्रकारची अद्याप दखल घेतली नाही तरी दिलेल्या आश्वासनाकडे सध्याचे मुख्य अधिकारी विक्रम मांडुरके यांनी लक्ष घालावे अशी मागणी व्यापारी बांधवाकडून होत आहे.



## थोडक्यात

### प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत

**पात्र कुटुंबाची सर्वेक्षण करुन ई- केवायसी पूर्ण करण्याच्या सूचना**

**बीड । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत पात्र कुटुंबाची आवास प्लस २०२४ सर्वेक्षण उपमहा निदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक ४ एप्रिल २०२५ रोजीच्या व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये आवास प्लस २०२४ सर्वेक्षण करताना पुढील बाबींच्या अंमलबजावणीसाठी सूचना दिल्या आहेत. राज्यातील सर्व १०० टक्के ग्रामपंचायत यांना सर्वेक्षकाचे मॅपिंग करून त्याची ई केवायसी १०० टक्के पूर्ण करणे, स्व: सर्वेक्षणाबाबत (Seif Survey) ग्रामपंचायत स्तरावर येथोचित जनजागृती करणे, आवास प्लस २०२४ सर्वेक्षण पूर्ण करतांना तालुकास्तरावरून किमान १० टक्के तपासणी (Cheking) करण्यासाठी तपासणी (Checker) म्हणून तालुक्यामध्ये कार्यरत विस्तार अधिकारी प्रर्यवेशक/ प्रर्यवेशिका, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता इत्यादी प्रकारच्या शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांची निवड करणे. निवडलेला तपासणीस (Checker) सर्वेक्षक (Surveyor) नसावा याची दक्षता घेणे. निवडलेल्या तपासणी (उहशलज्ञशी) यांना किमान १० टक्के सर्वेक्षित कुटूंबे तपासण्यासाठी तालुक्यातील ग्रामपंचायत वितरण करुन त्या ग्रामपंचायतींना त्याचे मॅपिंग करुन घेणे त्यांची ई – केवायसी पूर्ण करणे. सर्वेक्षण केलेल्या कुंटुंबाची माहिती केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या परवानगीशिवाय कोठेही प्रकाशित न करणे. वरील प्रमाणे दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करून सर्वेक्षणाची कार्यवाही विहीत वेळेत पूर्ण करावी अशा सूचना संचालक ग्रामीण गृहनिर्माण महाराष्ट्र राज्य यांनी दिल्या आहेत.

### विविध उन्हाळी खेळाचे क्रीडा कार्यालयातर्फे उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा यांचा जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र, विविध एकविध जिल्हा क्रीडा संघटना, बीड जिल्हा यांचे संयुक्त विद्यामाने आयोजित विविध खेळांचे मोफत उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबराचे आयोजन दिनांक २१ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत करण्यात आले असून या शिबिराचे उद्घाटन दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी क्रीडा संघटक तथा शिवछत्रपती पुरस्कारार्थी जे. पी. शेळके यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी, डॉ. अविनाश बारगजे, आजहर शेख, विनायक ओझे, चित्रा आगळे, उत्तरेश्वर सपाटे, उत्तम काळवणे, राधा तांबे, निसार तांबोळी,विजय जाहेर, क्षितिजा गव्हाणे, रमेश शिंदे, वैभव गिरी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले. यामध्ये मोफत उन्हाळी प्रशिक्षण शिबिरात क्रिकेट, खो–खो, कबड्डी, बेसबॉल, मैदानी, सॉफ्टबॉल, हॉकी, हॉलीबॉल,तायक्वॉदो, योगासन, नेटबोल, स्केटिंग, जिम्नास्टिक, कराटे, टेबल टेनिस या खेळाचे विस्तृतपणे माहिती दिली. शिवछत्रपती पुरस्कारार्थी जे. पी. शेळके यांनी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करताना खेळाडूंना उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे फायदे सांगून त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षकाकडून विविध खेळाचे शास्त्रशुद्ध पद्धती प्रशिक्षण घेऊन जिल्ह्यातील शाळांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्हयाचे नाव उंचवावे व उन्हाळी प्रशिक्षण शिबिरात जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत कवठेकर यांनी केले.

## अधिकाऱ्यांचा सत्कार करणे आणि त्यांनी सत्कार स्वीकारणे दोन्ही गैर; कामाला प्राधान्य दिले पाहिजे - ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

जनता नवीन आलेल्या अधिकाऱ्यांचा सत्कार करते. प्रतिनिधिक स्वरूपात एखादा दुसरा सत्कार होण्यास हरकत नाही. मात्र शेकडो सत्कार करणं आणि शेकडो सत्कार स्वीकारणे, हे चुकीच आहे. जनतेने आपले काम करावे आणि अधिकाऱ्यांनी आपले काम करावे, हा नियम आहे. त्यामुळे सत्कार स्वीकारणे चूक आहे तर दुसरीकडे सत्कार कोण करते, यालाही महत्त्व आहे. अलीकडच्या काळात मोठे अधिकारी आणि मोठ्या पुढार्यांसोबतचे फोटो प्रकाशित झाल्यानंतर जनतेने यावर चिंतन केले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांचा तुम्ही देखील सत्कार करू नका, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

अनेक जण सत्कार करतात. अनेकांचे सत्कार ते काय उद्योगधंदे करतात, हे माहीत असतानाही जाणीवपूर्वक स्वीकारले जातात. त्याचा समाजावर वेगळा प्रभाव पडत असतो. आम्ही प्रशासना बरोबर आहेत. प्रशासन आम्ही सांगतो ते ऐकत, अशा पद्धतीचा निरोप सत्काराच्या आणि गप्पागोष्टींच्या माध्यमातून ते समाजापर्यंत पोहोचवत असतात.

सत्कार करणारे सर्वच गैर आहेत, असे नाही. चांगले लोक देखील आहेत. पण सगळ्यांनी आपल्या भावनांना आवर घालून आपले काम करायला हवे. ग्रामीण भागातून एखादा येऊन सत्कार करत नाही. तर सत्कार करणाऱ्यांमध्ये अनेक जण लाभार्थी असतात. आणि त्यांचे फोटो नंतर काही कालांतराने गैर कारभारामुळे प्रसारित होतात. या बाबी अधिकाऱ्यांच्या दृष्टीने योग्य नाहीत. नुकतेच बिरूदेव यांनी आय.ए.एस. परीक्षा पास

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: दिनांक २२/०४/२०२५ रोजी पेहलगाम जिल्हा अनंतनाग काश्मीर येथे दहशतवादयानी पर्यटकांवर हल्ला करून निष्पाप २८ नागरिकांची हत्या केली आहे.सदर घटना माणुसकीला काळिमा फसणारी आहे. सदर घटनेचा बीड जिल्हा वकील संघाने निषेध व्यक्त करून बीड जिल्ह्याचे नव निर्वाचित जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांना बीड वकील संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले या वेळी बीड वकील संघांचे अध्यक्ष ॲड. रोहिदास येवले, उपाध्यक्ष ॲड. अविनाश गडगे, सचिव ॲड. यासेर पटेल, सहसचिव ॲड. श्रीकांत जाधव, ॲड. प्रवीण राख, ॲड. उद्धव रासकर उपस्थित होते.*

## दिव्यांगाच्या कागदपत्राची घरीच होणार पडताळणी



**बीड । प्रतिनिधी**

दिव्यांग निराधार व विविध योजनेतील लाभार्थ्यांना अपंगत्वामुळे हालचाल करता येत नसेल किंवा तहसील कार्यालयात येता येत नसेल तर अशा लाभार्थ्यांच्या कागदपत्राची (डीबीटी) आता घरीच पडताळणी होणार असून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार सुहास हजारे यांनी केले आहे.

संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजना, दिव्यांग लाभार्थी अतिवृद्ध व्यक्ती, असतील ज्यांना हालचाल करणे अशक्य आहे व जे तहसील कार्यालय किंवा डीबीटी कॅम्प साठी येऊ शकत नाहीत. त्यांचे आधार कार्ड, राशन कार्ड , बँक पासबुक आणि मोबाईल नंबर हा ८१४९४६८८८४ या मो. नंबर वर व्हाट्सअप ला कळवा अथवा सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी तथा तलाठी व मंडळ अधिकारी यांचे मार्फत तहसीलदार कळवावे, त्यांची (डीबीटी) कागदपत्राची पडताळणी घरबसल्या करून घेतली जाईल. त्यामुळे मित्र, नातलग, परिचित, शेजारी व तालुक्यातील सर्व नागरिकांना हा मेसेज कळवावा असे आवाहन तहसीलदार सुहास हजारे यांनी केले आहे.

## शासन निर्णयानुसार महात्मा बसवेश्वर जयंती ३० एप्रिल २०२५ रोजी सर्व कार्यालयात साजरी करावी-आत्मलिंग शेटे

**परळी । प्रतिनिधी**



जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीही प्रतिवर्षीप्रमाणे अक्षयतृतीयेला लिंगायत विरशैव समाजाच्या वतीने सर्वत्र फार मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यावर्षी बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५ रोजी आहे. कर्नाटक व त्या परिसरातील इतर शहरामध्येही फार धुमधडाक्यात ही जयंती साजरी केली जाते. कर्नाटक सरकारचे भवितव्य हे लिंगायत समाजावर आधारीत आहे.

शासन जी.आर.:– महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्रमांक २२००/८१९ प्र.क्र.८९/२०००/२९ मंत्रालय मुंबई १२/४/२००१ नुसार महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालय निमशासकीय कार्यालय, विविध संस्था इत्यादी ठिकाणी विरशैव सामाजाचे आराध्य दैवत साम्यवादाचे जनक क्रांतीसूर्य, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करावी असे आदेश आहेत. परंतु अनेक शासकीय कार्यालयात त्याची अंमलबजावणी होत नाही असे दिसून आलेले आहे. तरी या वर्षी शासन आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे सन्माननीय जिल्हाधिकारी यांनी बीड आदेश जिल्ह्यामधील सर्व शासकीय कार्यालयांना निदेर्शीत करावेत अशी मागणी लिंगायत संघर्ष समितीचे महाराष्ट्राचे मुख्य समन्वयक काकासाहेब कोयटे, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्रअप्पा मुंडे, बीड जिल्हाध्यक्ष आत्म लिंग शेटे यांनी केलेली आहे. दरम्यान, दि. ३० एप्रिल २०२५ अक्षयतृतीयेच्या दिवशी मोठ्या मानसन्मानाने क्रांतीसूर्य जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती सर्व विरशैव लिंगायत समाज बांधवांनी, भगीनी माताने मोठ्या उत्साहात व आपआपल्या घरी व सार्वजनिक ठिकाणी समाज मंदिरात शांततेत साजरी करावी असे आवाहन लिंगायत संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष आत्मलिंग शेटे यांनी केले आहे.



*बीड: डॉ.भीमराव पिंगळे विद्यालयात घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेत प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि ट्रॉफी प्रदान करताना डॉ.उघाडे साहेब आणि शाळेचे मुख्याध्यापक रोहिदास डोंगरदिवे सर सह विजय पवळ सर.*

## परळीमध्ये 'युवा माहेश्वरी' द्वारा आयोजित गर्भाशय मुख कर्करोग प्रतिबंधक लसीकरण शिबिर संपन्न

**परळी । प्रतिनिधी**

बांगड मेमोरियल ट्रस्ट आणि प्रदेश माहेश्वरी सभेच्या प्रेरणेतून परळी येथील युवा माहेश्वरी संघटनेच्या वतीने गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर प्रतिबंधक उपाय म्हणून पहिल्या लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. आजच्या या उपक्रमात ४० युवतींना लसीकरण करण्यात आले असून, हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे आणि भक्तिभावाने पार पडला. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बीड जिल्हा माहेश्वरी युवा संघटनेचे अध्यक्ष श्री. रोहनजी मुंदडा, जिल्हा सचिव श्री. नितेशजी लोहिया, बीड जिल्हा माहेश्वरी सभेचे सहसचिव व



▶▶ उर्वरित पान २ वर

# साहिल साबळे यांची भारतीय सैन्य दलात निवड

**● जिल्हा परिषदेत माध्यमिक मुलांच्या शाळेतील एनसीसी कॅडेट**

**गेवराई । प्रतिनिधी**

सैन्य भरतीचं स्वप्न उराशी बाळगलं होतं, त्या दृष्टीने त्याचे प्रयत्नही सुरु होते. आजअखेर त्यांचं सैन्य भरतीचं स्वप्न पूर्णात्वाला आलं आहे. त्याची जिद्द, मेहनत फळाला आली आहे. साहीलच्या या कामगिरीबद्दल मित्र परिवार व परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. आम्हा सर्वांना साहिलच्या या निवडीचा सार्थ अभिमान असल्याचं मत परिवारांनी व्यक्त केलंय.



साहिलच्या सैन्य दलातील निवडीने आम्ही खूप आनंदी झालो आहोत. ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. साहीलला हे यश सहजासहजी मिळालेलं नाही, त्यानं यासाठी प्रचंड कष्ट घेतले आहेत. आज माझ्या मुलांच्या निवडीनं ऊर अभिमानानं भरुन आला आहे. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची गेवराई येथील एनसीसी कॅडेट व विद्यार्थी साहिल साबळे याची भारतीय सैन्यदलात निवड झाल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक राजकुमार पोपळघट, एनसीसी विभाग प्रमुख लेफ्ट प्रवीणकुमार पंडित , तलाह कादरी सर , राऊत सर , गायकवाड सर , कुडके सर , गवळी सर,राठोड सर , विशाल काळे सर , झेंडेकर सर ,करवंदे सर पवार सर , पठाण सर श्रीमती बनसोडे मॅडम पाठक मॅडम रसाळ मॅडम, होळकर मॅडम ,राक्षे मॅडम , आदींनी सबंधित विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

